I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** मिरज शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0369 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/11/2023 20:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 21/11/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/11/2023
**Time From (वेळेपासून):** 11:16 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/11/2023 **Time (वेळ):** 20:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/11/2023 20:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मिरज शहर पोलीसस्टेशनच्या,उत्तर बाजुस असले, सुभाष टी स्टलचे समोर ,मिरज

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विनोद नामदेव मोहिते सफाई कामगार सां मि कु

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नदीवेस शास्त्री चौकमिरज,मिरज शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नदीवेस शास्त्री चौकमिरज,मिरज शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9130678091

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक किशोर जगन्नाथ जबडे प्रभारी मुकादम सां मि कु | | | 1. मदीना मश्जिद वलनेस टाकीजवळ,सुभाषनगर, क गट, मिरज शहर,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दीजबाब दि. 21.11.2023
मी विनोद नामदेव मोहिते, वय 36 वर्ष, व्यवसाय:- सफाई कामगार (कंत्राटी), वार्ड नं.20 सांगली मिरज कुपवाड, महानगरपालिका रा. नदीवेस शास्त्री चौक मिरज, ता.मिरज जि.सांगली. मो.नं. 9130678091.
मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहण्यास आहे. मी सन 2012 पासून सांगली मिरज कुपवाड, महानगरपालिका येथे कंत्राटी सफाई कामगार म्हणून मानधनावर नोकरीस लागलो आहे. मी सुमारे 2 वर्षापासून वार्ड नं.20, ख्वाजा वस्ती, कृष्णा घाट, गावठाण या परिसराचा सफाई कामगार म्हणून काम करीत आहे.
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अंतर्गत मिरज येथील वार्ड नं.20 मधील सफाई कामगार यांचेवर देखरेख करणेकरीता किशोर जबडे, मुकादम म्हणून नेमलेले आहे. किशोर जबडे यांनी सुमारे 4 महिन्यापुर्वी माझे कामाचे हजेरी पत्रक भरून मानधन काढण्यासाठी प्रत्येक महिन्याला 3,000/- रूपयांची मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना मानधनावर नोकरीस आहे, मला काय पैसे द्यायचे होणार नाही असे सांगितले होते. त्यावेळी त्यांने पैसे द्यावेच लागतील नाहीतर तुला कामावरून काढून टाकतो अशी धमकी दिली होती. त्यावेळी मी त्याला नाईलाजास्तव आता काय पैसे नाहीत, पुढे बघुया असे म्हणालो होतो.
माझी आई निला नामदेव मोहिते ही आजारी असल्याने मी सुमारे 15 दिवसापासून कामावरती गेलो नव्हतो. मुकादम किशोर जबडे यांनी मी गैरहजर असल्यामुळे मला दिवाळी पुर्वी भेटून तु कामावर येत नाहीस. मागे महिन्याला हजेरी लावण्याचे 3,000/- रूपये देतो म्हणला होतास परंतू अजुन पर्यंत तू 4 महिन्यांचे 12,000/- रूपये मला दिलेले नाहीस. मला तुला कामावरून कमी करावे लागेल असे सांगून त्याने मला 12,000/- रूपये लाचेची मागणी केली. मी त्यावेळी त्याला माझी आई आजारी असल्यामुळे तिचे औषधोपचारा करीता पैसे खर्च झालेले आहेत. आता काय माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगितले होते. त्यावेळी किशोर जबडे, मुकादम याने तुला 12,000/- रूपये द्यावेच लागतील नाहीतर मल्हारी माने याला कसे कामावरून काढून टाकले तसे तुलापण कामावरून काढून टाकतो अशी धमकी दिली. त्यावेळी मी त्याला नाईजास्तव पैशाची जुळणी करून सांगतो असे सांगितले.
सुमारे 2 ते 3 दिवसांपासून किशोर जबडे, मुकादम याने मला वारंवार फोन करून समक्ष बोलावून घेवून माझेकडे 4 महिन्याची हजेरी लावून मानधन काढले त्या मोबदल्यात प्रत्येक महिन्याला 3,000/- प्रमाणे एकुण 12,000/- रूपये मागितलेले आहेत. मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी काल दि. 20.11.2023 रोजी सकाळी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांची कार्यालयात भेट घेवून माझा लाच मागणीचा तक्रारी अर्ज दिला होता. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझी पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी साहेबांची ओळख करून देवून तक्रारी बाबत पुजारी साहेब कारवाई करतील असे सांगितले. पुजारी साहेबांनी माझा लाच मागणीचा तक्रारी अर्ज वाचून त्यावर सही केली. त्यानंतर श्री. पुजारी साहेब यांनी दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेवून त्यांची व माझी ओळख करून दिली. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार तोंडी कथन केली. त्यानंतर पुजारी साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचांना वाचण्यास दिला. मी तोंडी सांगितले तक्रार व तक्रारी अर्जातील मजकुर हा एकच असल्याची खात्री करून माझा तक्रारी अर्जावर दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या.
त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला जिल्हा क्रिडा संकुल, सांगली येथे हजर राहणेबाबत सुचना देवून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील हिरो स्प्लेंडर मोटारसायकल एमएच-09-एफझेड-2987 वरून कार्यालयातून रवाना होवून क्रिडा संकुल येथे दाखल झालो. काही वेळानंतर पोलीस उप अधीक्षक पाटील साहेब, पुजारी साहेब, दोन्ही पंच व स्टाफ हे त्यांचेकडील खाजगी कारने जिल्हा क्रिडा संकुल, सांगली येथे दाखल झाले. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी मोटार सायकल रोडकडेला लावून त्यांचे वाहनामध्ये बसलो. पुजारी साहेबांनी त्यांचे सोबत असले स्टाफची ओळख करून दिली.
त्यानंतर श्री. किशोर जबडे, मुकादम यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पुजारी साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर



Scanned with OKEN Scanner

दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. नागावकर यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. पाटील यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन किशोर जबडे, मुकादम यांची किसान चौक मिरज येथील वार्ड नं.20 चे आरोग्य विभागाचे कार्यालयात जावून भेट घेणेबाबत सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं. 1 नागावकर असे माझेकडील मोटार सायकलने रवाना होवून मिरज शहर पोलीस स्टेशनचे बाजुस असलेल्या रोडने जात असताना किशोर जबडे हे मला पोलीस स्टेशनच्या गेटसमोर थांबलेले दिसल्याने मी मोटारसायकल सदर ठिकाणी घेतली. मी किशोर जबडे यांना "काय नाराज झालाय काय" असे म्हणालो असता किशोर जबडे यांनी "नाराज होत नाही, नाराज झालो तर तुम्ही लय वाढीव हायसा, खोट बोलल की आपल डोक हालतय" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "आईच औषध, दवाखाना चालू असल्याचे सांगितले" त्यावर त्यांनी "अरे तीन महिने झाले, आईच औषध चालु हाय व्हय र.....चौथा महिना संपत आला" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कंपनीत चाललोय, टाकीच काम करायला" असे म्हणालो असता किशोर जबडे यांनी "तुझ्या सारखच मल्हारी मानेन केलतं, आज मल्हारी मानेची काय परिस्थीत हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मल्हारी माने बाहेर पडला की" असे म्हणालो. त्यावर किशोर जबडे यांनी "तशी तुमच्यावर वेळ येवू देवू नका एवढ लक्षात ठेवा" असे म्हणून त्यांनी उजवे हाताने इशारा करून माझेकडे पैशाची मागणी केली. त्यावर मी त्यांना "किती द्यायचे सांगा की" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "तुला माहिताय की, महिन्याला तीन हजार रुपये, चार महिन्याचे एकुण बारा हजार रुपये" असे म्हणून किशोर जबडे यांनी माझी हजेरी लावून मानधन काढल्याचे मोबदल्यात बारा हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना "एवढ काय होणार नाही, आठ हजार रूपये देतो" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "चार महिन्याचे बारा हजार रूपये होतात" असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना "आठ हजार देतो......उद्या दहा वाजता तुम्हाला देतो" असे सांगितले. त्यावर त्यांनी "ठिक आहे......उद्या दे, परवा दे, तेरवा दिवशी सांग आणि आठ दिवसांनी सांग, मला वाईट वाटत नाही" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "उद्या देतो" असे म्हणून मी व पंच नागावकर असे तेथून रवाना होवून पुजारी साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी पुजारी साहेबांनी पंच नागावकर व मला पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

एकंदरीत झाले पडताळणी कारवाईमध्ये किशोर जबडे, मुकादम यांनी उदईक दि.21.11.2023 रोजी पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याने पुजारी साहेब यांनी दि.21.11.2023 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला उदईक रोजी सकाळी 10.00 वा जिल्हा क्रिडा संकुल सांगली येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दि. 21.11.2023 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास पुजारी साहेब यांनी मला संपर्क करून जिल्हा क्रिडा संकुल सांगली येथे येणेबाबत सुचना दिल्या असता मी काही वेळानंतर जिल्हा क्रिडा संकुल येथे हजर झालो. काही वेळानंतर पुजारी साहेब, पोलीस निरीक्षक श्री. भिलारे, दोन्ही पंच, व स्टाफ असे त्यांचेकडील कारने व मोटार सायकलने जिल्हा क्रिडा संकुल सांगली येथे दाखल झाले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांची ओळख करून दिली. पुजारी साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता मी माझेकडील शिल्लकीतील 500/- रूपये दराच्या 16 नोटा असे एकुण 8,000/- रूपये हजर केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, पुजारी साहेब व मी सहया केल्या. पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवली व पुजारी साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नागावकर असे माझेकडील मोटार सायकलवरून रवाना होवून किसान चौक मिरज येथील वार्ड नं.20 चे आरोग्य विभागाचे कार्यालय येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पुजारी साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी कारने व मोटार सायकलने किसान चौक येथील वार्ड नं.20 चे आरोग्य विभागाचे कार्यालय येथे दाखल झाले. त्यावेळी कार्यालयात किशोर जबडे हे दिसून आले नसल्यामुळे मी माझे मोबाईल नंबर 9130678091 वरून किशोर जबडे यांचे 8087870794 या नंबरवर कॉल करून फोन स्पिकरवर ठेवून विचारणा केली असता त्यांनी ते कोल्हापूर रोडला गेले असल्याचे सांगितल्याने मी त्यांना मिरज शहर पोलीस स्टेशनचे बाजुस असे चहाचे गाडयावर येण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच नं.1 नागावकर असे आरोग्य विभागाचे कार्यालय येथून माझे मोटार सायकलवरून रवाना होवून मिरज शहर पोलीस स्टेशनचे उत्तर बाजुस असले सुभाष चहाचे गाडयाजवळ दाखल



Scanned with OKEN Scanner

झालो. आमचे पाठोपाठ पुजारी साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील कारने व मोटार सायकलने मिरज शहर पोलीस स्टेशनचे बाजुस असे चहाचे स्टॉल येथे सापळा लावून थांबून राहिले. काहीयेळानंतर किशोर जबडे हे अक्षय काटे, सफाई कर्मचारी यांचे मोटारसायकलने आम्ही थांबलो त्या चहाचे स्टॉल येथे दाखल झाले. त्यावेळी किशोर जबडे यांनी मला चहा पिणेस बोलवल्याने मी त्यांचे सोबत चहाचे स्टॉल येथे जावुन आम्ही चहा पिला त्यावेळी मी माझे सोबत असले पंच नं.1 नागावकर यांची ओळख ही चुलत मेहुणा असल्याचे सांगितले. त्यानंतर मी किशोर जबडे यांना "कामावर काढू नका ओ, त्या मल्हारी सारखी कशाला परिस्थिती करताय आमची" असे म्हणाले. त्यावर किशोर जबडे यांनी "चार महिने झालं, खोट बोलतोस तु" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आईच पण एचआयव्ही च चालु हाय औषध इकड तिकड" असे म्हणालो. त्यानंतर मी किशोर जबडे यांना "या की जरा बोलुया असे म्हणून चहाचे स्टॉलचे समोर असले रोडचे साईडला येवून बोलत थांबलो. त्यावेळी अक्षय काटे याने किशोर जबडे यांना "दादा मी शेडवर जावु का" असे विचारले असता किशोर जबडे यांनी "जावा की तुम्ही" असे म्हणालेने अक्षय काटे हा त्यांचेकडील मोटारसायकल वरून तेथून निघून गेला. त्यानंतर मी किशोर जबडे यांना "परिस्थिती एकदम बिकट चालल्या.... सांभाळुन घ्या कामावरन काढू नका" अशी विनंती केली. त्यावर त्यांनी "सांभाळुन घ्यायचे म्हणजे किती सांभाळुन घ्यायच" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "न्हाय ओ आमची बी परिस्थीती, एकट राबतय एकट हे करतय" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "महिन्याला पाच हजार रूपये द्यायला पाहिजेस तु, विस विस पंचवीस दिवस.... पंधरा दिवसाचा पगार किती झाला सांग मला, आठशे रूपये पगार हाय, पंधरा दिवसाचा पगार किती झाला" असे विचारले त्यावर मी त्यांना "सात आठ हजार रूपये होत्यात की" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "अर्ध तुझ, अर्ध माझ किती झाल हिसाब" असा विचारले असता मी त्यांना "झाल की आपल चौदा पंधरा, सोळा हजार होयत ना" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "तुझ नव्ह मी तुला दहा दिवस अॅडजेस्ट केलो पाच दिवसाच तु घे, पाच दिवसाच मला दे, हेच सांगतोय तुला, अरे सगळ्यांच तेच करतोय मी, तुझ सोळा सोळा दिवस, अठरा अठरा दिवस अँडजेस्ट केलय, अजुन सहया घेतल्या न्हाय तुझ्या हाय असे कोर ठेवलोय, मी तुला दाखवायला, एक महिन्यात तर एकोणीस दिवस, सत्ताविस दिवस हायत, तीन दिवस कामाला हायस फक्त" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "हया गेल्या महिन्यात हाय की फुल्ल" असे म्हणालो. त्यावर किशोर जबडे यांनी त्यांचे उजवे हाताने इशारा करून माझ्याकडे लाचेची मागणी केल्याने मी त्यांना "मग मी आता आठ हजार आणल्यात...... मोजुन घ्या" असे म्हणालो असता त्यांनी "दे मग बघु नंतर बाकीच" असे म्हणालेने मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील 8,000/- रुपये अँथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन किशोर जबडे, मुकादम यांचे समोर धरली असता किशोर जबडे यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजूचे खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी माझेकडील हातरूमाल डावे हाताने बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पुजारी साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने किशोर जबडे, मुकादम यांना पकडले.

सदर ठिकाणी पुजारी साहेबांनी किशोर जबडे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव लोकसेवक श्री. किशोर जगन्नाथ जबडे, प्रभारी मुकादम, वार्ड क्रं.20 आरोग्य विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका रा. मदीना मश्जिद वॉलनेस टाकीजवळ, सुभाषनगर, क गट ता.मिरज, जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

सदर ठिकाणी पुजारी साहेब यांनी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयामध्ये पूर्ण करण्यात आली.

तरी दि.20.11.2023 रोजी 11.40 वा ते 12.11 वा च्या दरम्यान लोकसेवक श्री. किशोर जगन्नाथ जबडे, प्रभारी मुकादम, वार्ड क्रं.20 आरोग्य विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका रा. मदीना मश्जिद वॉलनेस टाकीजवळ, सुभाषनगर, क गट ता.मिरज, जि.सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने मी केले कामाची 4 महिन्याची हजेरी लावून मानधन काढलेच्या मोबदल्यात प्रत्येक महिन्याचे 3,000/- प्रमाणे 4 महिन्याचे एकुण 12,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 8,000/- रूपये लाचेची मागणी करून दि.21.11.2023 रोजी 11.16 वा ते 12.14 वा च्या दरम्यान किशोर जबडे, मुकादम यांनी मिरज शहर पोलीस स्टेशनच्या उत्तर बाजुस असले सुभाष टी स्टॉलचे समोर माझ्याकडून 8,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री. किशोर जगन्नाथ जबडे, प्रभारी मुकादम, वार्ड क्रं.20 आरोग्य विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका रा. मदीना मश्जिद वॉलनेस टाकीजवळ, सुभाषनगर, क गट ता. मिरज, जि.सांगली यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून



Scanned with OKEN Scanner

पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above Information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJEEVKUMAR DATTARAYA ZADE(I (Inspector)) / 14601000450SDZM7601Y **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Om mohite

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(सपना आडसुळ)
पोलीस उप-निरीक्षक
मिरज शहर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJEEVKUMAR DAT
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14601000450SDZM760



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner